रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन

(संलग्न महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन, मुंबई)
सुप्रभात कॉम्प्लेक्स, पेझारी नाका, मु. आंबेपूर, पो. पोयनाड,
ता. अलिबाग, जि. रायगड-४०२ १०८.

प्रौढ पुरुष / महिला गट जिल्हा निवड चांचणी व अजिंक्यपद कबड्डी स्पर्धा २०२६

परिपत्रक

सामन्यासंबधी नियम व सूचना

कालावधी : दिनांक ४ ते ७ डिसेंबर २०२६
स्थळ : छत्रपती शिवाजी महाराज क्रीडागंण भुवनेश्वर रोहा
आयोजक : मा. सुनिल तटकरे युवा प्रतिष्ठान रोहा व ग्रुप ग्रामपंचायत वरसे, ता. रोहा

१) सर्व सामने आखिल भारतीय कबड्डी फेडरेशनच्या नविन नियमानुसार खेळविले जातील
२) रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनने स्पर्धा खेळण्यास परवानगी दिलेल्या संघानाच या सामन्यात भाग घेता येईल.
३) नविन संघाला भाग घ्यावयाचा असल्यास त्याने नविन फॉर्म भरुन असोसिएशनची पूर्व परवानगी घेवून सहभाग घ्यावा.
४) खेळाडूंना खेळताना मार लागल्यास संयोजक जबाबदार नाही. मात्र प्रथमोपचार व्यवस्था क्रीडांगणावर राहील.
५) चालू सामन्यातील निर्णयाबाबत तक्रार असल्यास सामना संपल्यानंतर अर्ध्या तासाच्या आत अनामत रक्कम रुपये (२५००/-) भरुन करावी निर्णय विरोधी लागल्यास अनामत रक्कम परत मिळणार नाही.
६) निर्देशांक :
पुरुष वजन ८५ किलो
महिलान वजन ७५ किलो
७) प्रौढ पुरुष / महिला या दोन्ही गटांच्या प्रवेश अर्ज ८००/- रुपये फि सह दिनांक २५ नोव्हेंबर २०२६ पर्यंत श्री. जनार्दन पाटील सर, पेझारी मोबाईल ९२७०९२६४३६ यांच्याकडे सकाळी ११ ते ५ या वेळेतच प्रत्यक्ष आणून दयावी.
८) ज्या खेळाडूंना संघ बदल करावयाचा आहे. त्यांनी आवश्यकत्या कागदपत्रांसह दिनांक २५/११/२०२६ पर्यंत संपर्क साधावा त्यानंतर येणाऱ्या खेळाडूंना संघ बदल करुन दिला जाणार नाही.
९) संघ बदलीची प्रकीया न करता एखादया खेळाडूने परस्पर दुसऱ्या संघातून नांव नोदंणी केली आहे हे छाननी समितीच्या लक्षात आले तर अशा खेळाडूस बाद केले जाईल
१०) स्पर्धेच्या नियोजनात परिस्थितीनुसार बदल करण्याचे सर्व अधिकार रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनला राहतील.
११) माहितीपत्रक व प्रवेश अर्ज असोसिएशनच्या कार्यालयात व वेबसाईडवर उपलब्ध आहेत.
१२) जे संघ चाचणी स्पर्धेत सहभागी होणार आहेत त्यांनी संघाची व खेळाडूंची ऑनलाईन नोंदणी करणे गरजेचे आहे.
१३) काही शंका असल्यास श्री. अजिंक्य पाटील मोबाईल नं. ८४४६०९९७९७ यांच्याशी संपर्क साधावा.

Apatil

मा. डॉ. चिन्ना पाटील
कार्यवाह
रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन